॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. कबचौउमवि/7-ह/सु.प./2748 /2026 दिनांक : 01/09/2026

**महत्वाचे / कालमर्यादित**

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत कला व विज्ञान महाविद्यालयांचे मा. प्राचार्य...

विषय:- माहे मार्च/एप्रिल, 2026 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत बी.एस्सी. (भूगोल) आणि बी.ए.(इंग्रजी) या अभ्यासक्रमास उत्तीर्ण दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थीनीची माहिती पाठविणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, प्रा. वसंत चिंधू नारखेडे, जळगाव यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास खालील दोन सुवर्ण पदक प्रायोजित केलेले आहेत, ते खालीलप्रमाणे-

1) ***"प्रा. वसंत चिंधू नारखेडे सुवर्ण पदक"*** - बी.एस्सी. (भूगोल) या विषयात विद्यापीठातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास (मुलगा) सुवर्ण पदक प्रदान करणे.
2) ***"सौ. प्रतिभा वसंत नारखेडे सुवर्ण पदक"***- बी.ए. (इंग्रजी) या विषयात विद्यापीटातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्याथीनीस (मुलगी) सुवर्ण पदक प्रदान करणे.

वरील दोन्ही सुवर्ण पदक प्रदान करतांना दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनीचा प्राधान्याने विचार करावा, असे सुचित केले आहे.

उपरोक्त अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने माहे **मार्च/एप्रिल**, 2026 मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत बी.एस्सी. (भूगोल) व बी.ए. (इंग्रजी) हा **अभ्यासक्रम पुर्ण करण्याच्या कालावधीत दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थीनी** उत्तीर्ण झालेले आहेत, अशाच विद्यार्थी/विद्यार्थीनीची माहिती, खाली नमूद केलेल्या तक्यात भरून, **दिनांक** 30/09/2026 **पावेतो विद्यापीठास पोहोचेल अशा बेताने पाठवावी**, जेणेकरून उपरोक्त प्रायोजित केलेले सुवर्ण पदक प्रदान करतांना दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थीनीस प्राधान्य देता येईल.

| अ.क्र. | विद्यार्थी/विद्यार्थीनीचे नांव | अभ्यासक्रम | • दिव्यांगाची वर्गवारी | मार्च / एप्रिल 2026 परीक्षेशी निगडीत माहिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बैठक क्रमांक | पी.आर.एन.क्रमांक |
| 1 | 2 | 3 | | 4 | 5 |
| | | | | | |

- **दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थीनींची वर्गवारी शासन क्रमांक संकीर्ण**-2016/**प्र.क्र.**302/**विशि**-3, **दिनांक** 04 **मार्च**, 2017 **मध्ये नमूद करण्यात आली आहे.**

उपरोक्त माहितीसोबत खालील कागदपत्र/दस्तऐवजांच्या **साक्षांकीत प्रती** देखील सादर कराव्यात.

1. प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाच्या गुणपत्रकाची (Mark Statement) ची प्रत.
2. मा. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनीस दिव्यांग असल्याबाबत दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

तरी उपरोक्तप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

( प्रा.यो.ना.पाटील )
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ